



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४ | अंक ३१२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# वेळ पडली तर मराठे भाजपचा एन्काउंटर करणार, मनोज जरांगे पाटील यांचं मोठं वक्तव्य

**बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना भाजपला मोठा इशारा दिला. “वेळ पडली तर मराठे त्यांच्या भाजपचा एन्काउंटर करणार”, असं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे. “अजून काही ठरले नाही. इच्छुक वाढले आहेत. चर्चा केली. आपल्याला 95 टक्के समाजकरण आणि 5 टक्के राजकारण करायचे आहे. उमेदवारबद्दल चर्चा झाली. आपला बाप ( समाज ) 20 तारखेला येणार आहे, आणि तो बाप निर्णय घेणार आहे. शेती, आरक्षण, दलित मुस्लिम, गोरगरीब ओबीसींच्या मुद्द्यावर चर्चा झाली. मी सर्वांचे मते जाणून घेतली. उद्या कोणीही बोलु नये की, आम्हाला मते मांडू दिली नाहीत. आजपर्यंत 1800 उमेदवारी अर्ज आले आहेत, आणि आज पुन्हा काही




अर्ज आले आहेत”, असं मनोज जरांगे यांनी सांगितलं. “ही लाट देवेंद्र फडणीस यांचा कार्यक्रम लावणार आहे. या मनस्थितीमध्ये फडणवीस यांनी जायला भाग पाडले. जो समाज त्यांच्या बाजूने होता त्यांची मुडदे फडवणीस यांनी पाडली. देशातील सर्वात डागी माणूस, आणि देशात पहिला आहे. न्यायाची अपेक्षा फडवणीस यांच्याकडून होती, पण त्यांनी विष आमच्या नारड्यात ओतले. फडवणीस यांनी जाताना खुन्नस दिली आणि मला मराठ्यांशी काही देणेघेणे नाही हे दाखवले. धनगर आरक्षणचा निर्णय फडवणीस यांनी घेतला आणि त्यांनी रद्द केला. वेळ पडली तर मराठे त्यांच्या भाजपचा एन्काउंटर करणार”, असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला. विशेष म्हणजे नुकतंच माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी जरांगे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आज मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, अंतरवली सराटीमध्ये सध्या मनोज जरांगे पाटील हे ज्यांनी विधानसभा उमेदवारासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांशी चर्चा करत आहेत. या बैठकीला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात उमेदवार उपस्थित झाले होते. या बैठकीसाठी आलेल्या गाड्यांची 10 एकरच्यावर जागेत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली

### अनेक नेत्यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेट

दरम्यान, मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत. लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांच्या भूमिकेमुळे सत्ताधारी पक्षांना मोठा तोटा सोसावा लागला होता. यानंतर आता विधानसभेत मनोज जरांगे हे स्वत: मराठा समाजाचे उमेदवार उभे करणार आहेत. त्यांच्या या भूमिकेमुळे अनेक राजकीय पक्षांना धडकी भरली आहे. त्यामुळे अनेक आजी-माजी आमदारांनी आतापर्यंत मनोज जरांगे यांची अंतरवली सराटीत जावून त्यांची भेट घेतली आहे.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग साहित्य वितरण



**दैनिक लोकआरंभ//**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे राज्य संघटक संजय प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिंपळगाव कोझिंरा गावातील कोकणेवाडी कारवाडी आणि गावठाण जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग साहित्य वितरण आले या विभागातील राज्याचे महसूल मंत्री नामदार बाळासाहेब थोरात माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे आमदार सत्यजित तांबे यांचे विश्वसनीय समर्थक शुभम घुले यांच्या विनंतीवरून या भागातील शाळेंना मदत करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती ती आज पूर्ण करण्यात आली यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर नगर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ काळे संगमनेर तालुका अध्यक्ष संजय गोपाळे ग्रामपंचायत पिंपळगाव कोझींरा वतीने मन:पूर्वक आभार याप्रसंगी प्रथम नागरिक सरपंच सोनाली ताई करपे .उपसरपंच संगम आहेर शाळेचे मुख्याध्यापक सोनवणे सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते याप्रसंगी ग्रामस्थ बादशाह पाटील वाळुंज रोहिदास पाटील मोरे .संदीप करपे दत्तात्रय कडलक संजय खर्डे. बाबासाहेब आहेर. व इतर नागरिक उपस्थित होते

## विधानसभेत जरांगे पुन्हा खेळ बिघडवणार? पाहा कुठे होऊ शकते भाजपला नुकसान



निवडणुका लढायच्या का, याचा निर्णय 20 तारखेला जरांगे घेणार आहेत. त्याआधी अंतरवाली सराटीत जरांगेनी इच्छुक उमेदवारांच्या भेटीगाठी सुरु केल्यात. याआधीही जरांगेंनी मुलाखती घेतल्या असून संभाव्य यादीही जरांगेंनी तयार केली. पण इच्छुकांच्या भेटीगाठीसह रात्रीच्या 2 भेटी खास आहेत.. भाजपचे नेते मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांनी मनोज जरांगे पाटलांची रात्री पावणे 2 वाजता भेट घेतली. 8 दिवसांतच विखे दुसऱ्यांदा जरांगेंच्या भेटीला आले. तर विखेंच्या भेटीनंतर रात्री पावणे 3 वाजता शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे राजेश टोपेंनीही जरांगेंची भेट घेतली.

सुजय विखेंनी संगमनेरमधून काँग्रेसच्या बाळासाहेब थोरातांविरोधात लढण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र एका घरात एकच तिकीट या धोरणामुळं भाजपनं तिकीट नाकारल्याची माहिती असल्यानं सुजय विखे अपक्ष लढण्याची शक्यता आहे. त्यामुळं अपक्ष लढल्यास मराठा समाजाची मदत मिळेल का ?, याचाच अंदाज घेण्यासाठी विखेंनी जरांगेंची भेट घेतल्याची चर्चा आहे. या भेटीवरुन विचारलं असताना, आता सरकारच राहिलं त्यामुळं चर्चा करुन काय उपयोग ?, त्यांचा मालकच भरकटलाय म्हणत फडणवीसांवर निशाणा साधला.लोकसभा निवडणुकीत जरांगे पाटलांनी उमेदवार दिले होते...जरांगे फॅक्टरमुळं थेट नुकसान महायुतीचंच झालं. आणि महाविकास आघाडीला फायदा झाला. मराठवाड्यातील लोकसभेच्या 8 मतदारसंघापैकी 7 ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार जिंकले आणि महायुती पराभूत झाली. आता पुन्हा एक तर पाडापाडी करणार किंवा उमेदवार देणार हे जरांगेंनी ठरवलंय. 20 तारखेला जरांगेंनी उमेदवार देण्याचं ठरवलं तर मतांचं विभाजनं मोठ्या प्रमाणात होणार हे निश्चित आहेत. 2019ची आकडेवारी पाहिली तj मराठवाड्यात भाजपचे 17 आमदार, शिवसेनेचे 12 आमदार निवडून आले होते. त्यापैकी शिंदेंकडे 9 आणि ठाकरेंकडे 3 आमदार आले..काँग्रेसचे 8 आमदार तर राष्ट्रवादीचेही 8 आमदार आले. त्यापैकी अजित पवारांकडे 6 आणि शरद पवारांकडे 2 आमदार आले आणि 3 इतर आहेत. मराठवाड्यातील 8 जिल्ह्यातील 48 विधानसभा मतदारसंघासह अहमदनगर अर्थात अहिल्यानगर, नाशिक आणि सोलापूर या 3 जिल्ह्यांमध्ये जरांगे फॅक्टरचा प्रभाव आहे. त्यामुळं जरांगे इथंही कोणाचाही खेळ बिघडवू शकतात. जरांगेंच्या टार्गेटवर महायुतीतून फडणवीस आणि भाजपच आहे... मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर जरांगे अधिक आक्रमक बोलताना दिसत नाहीत. त्यामुळं पाडापाडी किंवा उमेदवार देण्याचं जरांगेंचं ठरलंच तर टार्गेटवर पूर्ण महायुतीच की भाजप हेही लवकरच दिसेल.

# हॅट्रीकची संधी न देणाऱ्या गेवराई मतदार संघाची परंपरा लक्ष्मण पवार मोडीत काढणार का ?

## शिवाजीराव पंडीत, बदामराव पंडीत यांची आमदारकीची हॅट्रीक हुकली होती

## २०१४ साली लक्ष्मण पवारांची ६० हजाराची लीड २०१९ ला साडेसहा हजारावर आली

**बीड / प्रतिनिधी**

गेवराई मतदार संघाचे राजकारण पंडीत-पवार घराण्याभोवतीच फीरत असते, राजकारणातील भिष्माचार्य म्हणुन ओळखले जाणारे शिवाजीराव दादा पंडीत यांचे या मतदार संघावर १९९५ पर्यंत एकहाती सत्ता होती, ९५ ला बदामराव पंडीतांचा राजकारणात उदय झाल्यानंतर १९८५ ते २०१४ पर्यंत पंडीतांचेच राज्य होते, २०१४ च्या निवडणुकीत स्व.गोपीनाथ मुंडे यांनी लक्ष्मण पवार यांना भाजपाची उमेदवारी दिल्याने बदामराव पंडीत व अमरसिंह पंडीत यांना लक्ष्मण पवार विरोधात एकत्र यावे लागले याची रीॲक्शन होवुन तालुक्यात पंडीत विरेधात लाट निर्माण होवुन लक्ष्मण पवारांचा साठ हजार मताने विजय झाला होता तर २०१९ ला साडेसहा हजाराची लीडने पवारांनी विजय हस्तगत केला होता, आता



२०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. गेवराई विधानसभा मतदार संघात आतापर्यंत झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवाजीराव पंडीत, बदामराव पंडीत व विद्यमान आमदार लक्ष्मण पवार यांनी सलग दोन-दोन टर्म पुर्ण केले आहे मात्र या मतदार संघात आज पर्यंत एकानेही हॅट्रीक साधलेली नाही शिवाजीराव पंडीत यांची १९९५ साली बदामराव पंडीत हे अपक्ष असताना हॅट्रीकची संधी हूकली होती. तसेच २०१४ साली बदामराव पंडीत यांची हॅट्रीक भाजपा उमेदवार लक्ष्मण पवार यांच्यामुळे हुकली यासोबतच विद्यमान आ.लक्ष्मण पवार हे देखील दोन वेळा विजयी झाले आहे आता ते गेवराई मतदार संघाची हॅट्रीक न होऊ देण्याची परंपरा मोडीत काढणार का ? असा प्रश्न सध्या चर्चिला जात आहे.

राज्यासह बीड जिल्ह्यातील राजकारणात सध्या अनेक घडामोडींमुळे समीकरणेही बदलली आहेत.गेवराई मतदार संघाचे विद्यमान आमदार लक्ष्मण पवार यांनी दोन वेळा आमदारकी भुषविली मात्र गेल्या दोन वर्षात पालकमंत्र्यांकडून त्यांना विकास कामात व समिती निवडण्याच्या प्रक्रियेतून डावलण्यात येत असल्याने आपण भाजप श्रेष्टी वर नाराज असल्याचे जाहिर करून निवडणूक न लढविण्याचे जाहीर केले होते त्यानंतर कार्यकर्त्यांच्या आग्रहाखतर शरद पवार गटातून तुतारी चिन्ह हाती घेवून निवडणूक लढविन्याचे संकेत त्यांनी दिले आहे.

* २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत लक्ष्मण पवार ९९६२५, विजय सिंह पंडीत ९२८३३ तर बदामराव पंडीत ५०८९ मते मिळविली होती यामध्ये विजयसिंह पंडीत यांचा ६७९२ मताने लक्ष्मण पवार यांनी पराभव केला होता.

• २०१४ च्या निवडणुकीत नवखे असलेले लक्ष्मण पवार यांनी बदामराव पंडीत यांचा ६०००१ मताने पराभव केला होता.

• २००९ च्या निवडणुकीत बदामराव पंडीत व अमरसिंह पंडीत यांच्यात लडत हौउन अमरसिंह पंडीत यांचा २३४७ मताने निसटता पराभव झाला होता.

• २००४ च्या निवडणुकीत अमरसिंह पंडीत यांनी भाजपा कडून उमेदवारी घेत राष्ट्रवादीच्या बदामराव पंडीत यांचा १६६०० मताने पराभव केला होता.

### वर्ष –विजयी उमेदवार- पक्ष –पडलेली मते

१९७२ – सुंदरराव सोळंके (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) बिनविरोध
१९७८- पंडीत शिवाजीराव अंकुशराव (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) ३८५३९
१९८०- पवार माधवराव शिवाजीराव (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) ३४७९८
१९८५- पंडीत शिवाजीराव अंकुशराव (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) ४७८४४
१९९०- पंडीत शिवाजीराव अंकुशराव (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) ६७७७०
१९९५- पंडीत बदामराव पंडीत लहूराव (अपक्ष) ७१३६२
१९९९- पंडीत बदामराव लहुराव (अपक्ष)६८९३७
२००४ – पंडीत अमरसिंह शिवाजीराव –भाजपा ८०४१४
२००९- पंडीत बदामराव लहुराव –राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी १००८१६
२०१४- पवार लक्ष्मण माधवराव –भाजपा १३६३८४
२०१९ –पवार लक्ष्मण माधवराव –भाजपा ९९६२५
२०२४

# गरीब अधिक गरीब, तर श्रीमंत अधिक श्रीमंत!

दारिद्र्याचे बहुआयामी दृष्टचक्र देशभरातील गरिबीची वाढती लोकसंख्या, जातीवाद, श्रीमंत आणि गरीब वाढती आर्थिक दरी, बेभरवशाची शेती, भ्रष्टाचार, पुराणमतवादी विचार, बेरोजगारी, निरक्षरता आणि वेगवेगळ्या साथीच्या रोगाचा फैलाव आदी प्रमुख कारणे असली तरी वाढता उपभोगवाद, चंगळवाद आणि अपुरा रोजगार यामुळेच अधिक विषमता आणि अधिक दारिद्र्य असे एक दुष्टचक्र निर्माण झालेले दिसते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टानुसार लोकांना विशिष्ट निवडीमुळे नव्हे तर अन्न, घर, जमीन, आरोग्य या कारणांमुळे गरिबीत जीवन जगण्यास भाग पाडले जाते. वाचनीय व चिंतनीय लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या सुंदर शब्दशैलीत... संपादक.

आजही जगातील ८ ते १० टक्के लोक प्रतिदिवस १.९० डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर उदरनिर्वाह करतात. तर भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ३६ कोटी लोक मुलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर सकल अर्थव्यवस्थेच्या सदृढ वाढीसह अर्थव्यवस्थेचा फायदा वंचित समाजापर्यंत पोचेल, शिक्षण, आरोग्य आणि दरडोई उत्पन्न सुधारून अधिकाधिक नागरिकांना दारिद्र्यरेषेच्या परिघाबाहेर कसे आणता येईल, यादृष्टीने चिंतन होणे आवश्यक आहे. जागतिक बहुआयामी दारिद्र्य स्थिती गरिबी मोजण्यासाठी केवळ उत्पन्न हा निकष महत्त्वाचा नसून पोषण, बालमृत्यू, शालेय शिक्षण, शाळेची उपस्थिती, स्वयंपाक इंधन, स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज, गृहनिर्माण व घरगुती मालमत्ता अशा १० निकषांच्या आधारे गणना केली जाते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या २०२०च्या जागतिक बहुआयामी गरीबी निर्देशांक-एमपीआय अनुसार १०७ विकसनशील देशांमधील सुमारे १.३ अब्ज लोक दारिद्र्यामध्ये असल्याचे दिसते. त्यामध्ये जवळपास ५५८ दशलक्ष लोक उप-सहारा आफ्रिकेतील आणि ५३० दशलक्ष दक्षिण आशियामधील आहेत. ६७ टक्के लोक मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमधील आहेत. जगभरातुनच दारिद्र्य निर्मूलनाचे प्रयत्न सुरू आहेत. पण अजुनही बऱ्याच देशांमध्ये मुलभूत सोयीसुविधांची कमतरता आहे. यामध्ये प्रामुख्याने उपासमार, आरोग्य सेवा, पौष्टिक अन्नाची कमतरता, असुरक्षित घरे, सामाजिक अवहेलना, धोकादायक कामाची परिस्थिती, असमान संधी आणि मर्यादित राजकीय प्रवेश आदी संकटांना सामोरे जावे लागते. जगातील कोट्यवधी लोक अत्यंत गरीबीने जगत आहेत. जागतिक पातळीवर उत्पन्न असमानता वाढत असून गत काही वर्षात अब्जाधिशांच्या संपत्तीत १२ टक्क्यांनी वाढ तर गरीबांच्या संपत्तीत ११ टक्क्यांची घट झाली आहे. यामुळे शाश्वत विकासासाठीच्या २०३०च्या अजेंड्यानुसार सर्वसमावेशक, शाश्वत आणि न्याय्य आर्थिक वाढीसाठी पूर्णपणे गरिबी उच्चाटनाचे आव्हान कायम आहे.

विषमताविरहीत विकासाचे आव्हान देशात गेल्या कित्येक दशकांपासून सरकारचा गरिबी निर्मुलनाचा प्रयत्न सुरू आहे. बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये देशातील अर्ध्याहून जास्त गरीब जनता आहे तर दिल्ली, केरळ आणि गोवा या राज्यांमध्ये गरिबीचे प्रमाण सर्वात कमी आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या २०२० च्या जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकानुसार देशाने दारिद्र्य-निर्मूलनाच्या दरात गेल्या दहा वर्षात लक्षणीय प्रगती केली, ही बाब स्वागतार्ह ठरते. मात्र आरोग्य ही देशातील अजूनही एक मोठी समस्या असून अनेक खेडी सक्षम अशा आरोग्य सोयीसुविधांपासून वंचितच आहेत. दुर्दैवाची बाब अशी की, सरकारकडून शिक्षण, आरोग्य यासारख्या मुलभूत सोयीसुविधांवर केल्या जाणाऱ्या खर्चाचा लाभ फार थोड्या लोकांपर्यत पोचतो. वर्ल्ड बँकेचे माजी संशोधन संचालक मार्टिन रॅवालियन यांनी म्हटल्याप्रमाणे गरिबी निर्मूलन करून सामाजिक सुधारणा करण्याच्या मार्गातलं सर्वात मोठं आव्हान आहे, ते वाढत्या विषमतेचं! एकीकडे विकास धोरणं सर्वांत जास्त गरीब असणाऱ्यांकडे पुरेशी पोचत नसल्याची वस्तुस्थिती आहे तर दुसरीकडे असमान संपत्ती वितरणामुळेही सामाजिक समावेशकतेला अडथळा निर्माण होतो आहे. त्यामुळे निती आयोगाच्या २०१९ च्या शाश्वत विकास अहवालानुसार गरीबी उपासमार आणि आर्थिक असमानता वाढल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. कारण देशभरातीत १० टक्के श्रीमंताकडे देशातील एकूण संपत्तीच्या ७७.४ टक्के संपत्ती आहे तर उर्वरित बहुसंख्य लोकांना रोजीरोटीचा प्रश्न भेडसावतोय. ऑक्सफॅम या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या रिवार्ड वर्क, नॉट वेल्थ या अहवालामध्ये २०१८ ते २०२२ या काळात देशात अब्जाधिशांच्या संख्येत तब्बल ७० टक्क्यांनी वाढ होईल, असा अंदाज आहे. दारिद्र्याचे बहुआयामी दृष्टचक्र देशभरातील गरिबीची वाढती लोकसंख्या, जातीवाद, श्रीमंत आणि गरीब वाढती आर्थिक दरी, बेभरवशाची शेती, भ्रष्टाचार, पुराणमतवादी विचार, बेरोजगारी, निरक्षरता आणि वेगवेगळ्या साथीच्या रोगाचा फैलाव आदी प्रमुख कारणे असली तरी वाढता उपभोगवाद, चंगळवाद आणि अपुरा रोजगार यामुळेच अधिक विषमता आणि अधिक दारिद्र्य असे एक दुष्टचक्र निर्माण झालेले दिसते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टानुसार लोकांना विशिष्ट निवडीमुळे नव्हे तर अन्न, घर, जमीन, आरोग्य या कारणांमुळे गरिबीत जीवन जगण्यास भाग पाडले जाते. तज्ज्ञ सांगतात, की एखादी व्यक्ती गरीब असणे म्हणजे केवळ दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणे असे नाही तर शिक्षण, आरोग्य, निवारा, कुटुंब, न्याय, समुदाय सहाय्य, जमीन, पत, संधी आणि क्षमता व इतर घटक यासारख्या भौगोलिक, जैविक आणि सामाजिक उत्पादक संसाधनांचा अभाव असतो. म्हणजेच दर दिवसाला दोन डॉलर्स किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न पातळी असते. कुपोषण, बेरोजगारी, विषमता असे बरेच घटक दारिद्र्यामध्ये भर टाकतात. त्यामुळे दारिद्र्य ही एक गुंतागुंतीची समस्या असल्याचे दिसते.

समताधिष्ठित विकास हाच मार्ग विकसित देशामध्ये दारिद्र्य व विषमता कमी होण्याची प्रवृत्ती असली तरी अद्यापही बहुसंख्य विकसनशील देशांत विकासाच्या वाढीबरोबरच दारिद्र्यही वाढते आहे. शिवाय कोरोना महामारीमुळे अर्थव्यवस्थेतील देवाण घेवाण ठप्प झाल्यामुळे कोट्यवधी लोकांचे रोजगार हिरावले गेले आहेत. त्यांच्या उत्पन्नावर नकारात्मक परिणाम झाला आहे. ही बाब बहुतांश नागरिकांना पुन्हा गरिबीत ढकलणारी ठरते. या पार्श्वभूमीवर भविष्यकाळाचा विचार करता वाढत्या उत्पन्न विषमतेतून दारिद्र्यही वाढेल हे उघडच आहे. या सर्व बाबी विचारात घेता समाजातील वंचित, गरीब, दुर्लक्षितांना समान संधी देणाऱ्या सर्वसमावेशक, समताधिष्ठित विकासाचा मार्ग अवलंबावा लागेल. त्यासाठी वाढत्या श्रमशक्तीच्या तुलनेत अधिक वेगाने रोजगार संधी निर्माण कराव्या लागतील. अर्थात वाढते कुपोषण, बेरोजगारी, विषमता या महत्वपूर्ण आव्हानांचा कार्यक्षम स्वरुपाच्या वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून समूळ निपटारा करावा लागेल.

# आदर्श देवगाव ग्रामपंचायत अंतर्गत हरदेव नगर या ठिकाणी मतदान जनजागृती अभियाना अंतर्गत मतदाता जनजागृती कार्यक्रम, संपन्न ,

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी, वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव ग्रामपंचायत व हरदेव नगर जिल्हा परिषद शाळा देवगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने मतदान जनजागृती अभियानांतर्गत मतदाता जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला, . सर्वप्रथम शाळेतून सर्व विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष श्री गणेश राजेभाऊ गवळी, उपाध्यक्ष श्री दिनकर राजेभाऊ सुरवसे ,शालेय समिती सदस्य, काडीवडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख मा.श्री गांडगे सर केंद्रीय मुख्याध्यापक श्री. पवार सर गावचे प्रथम नागरिक रामेश्वर अश्रुबा सुरवसे ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, गावातील व




हरदेव नगर वस्तीतील नव मतदार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .कार्यक्रमात सर्वप्रथम भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . आपल्या प्रस्ताविकामध्ये केंद्राचे केंद्रप्रमुख श्री . गांडगे सर यांनी उपस्थित मतदार बंधू-भगिनींना शंभर टक्के मतदान करण्याचे आव्हान केले. त्यानंतर शाळेतील इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती वर आधारित पथनाट्य व पोवाडा सादर केला तसेच शाळेतील स.शि. श्री लांडगे सर यांनी स्वरचित मतदान जनजागृती गीत सादर केले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्री हाडुळे सर शाळेतील सहशिक्षिका श्रीमती गाढवे मॅडम , श्रीमती पवार मॅडम शाळेतील युवा प्रशिक्षणार्थी श्री गवळी सर लमान तांडा शाळेचे मुख्याध्यापक श्री शेळके सर परडी शाळेचे स. शि. श्री लोकरे सर उपस्थित होते यावेळी गावातील नव मतदारांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले

# कोणाचा काही होऊ द्या सामान्य जनतेला न्याय देण्या साठी आम्ही माजलगाव विधानसभा निवडणूक लढणारच असं मनात मुस्लिम मोर्चा चे नवीदोद्दिन सिद्दिकी कंबर कसून निवडणुकीचे रिंगणात

माजलगाव मतदार संघाच्या सर्व सामान्य जनतेचा झिरो विकास पाहता व भ्रष्टाचाराचा हिशोब पाहता तसेच माजलगाव विधानसभा मतदार संघात एक लाख पेक्षा जास्त वोटिंग मुस्लिम समाजाची आहे माजलगाव मतदार संघाचा विकास आज पर्यंत एक ही आमदारांनी पाहिजे तसा केला नाही एमआयडीसी प्रश्न अपूर्ण सरकारी दवाखान्याचे हाल पाहता जनतेला कसली ही सुविधा नाही दारिद्र रेषेखालचे लोक स्वस्त राशन दुकान व राशन कार्ड पासून दारोदार भटकत फिरत आहे इतकाच नाही तर माजलगाव शहराला कोणत्या शासकीय कार्यालयाला वाली राहिलेला नाही त्यामुळे जनतेचे विविध विकास कामे होत नसण्याची चर्चा सर्वकाळ होत आहे माजलगाव चे युवा नेते व विविध पक्ष व संघटनामार्फत वारंवार सर्व सामान्य माजलगावचे जनतेने आंदोलने उपोषणे करून ही कुठला ही विकासा कोणत्याही आमदाराने सर्व सामान्यांची दखल घेतली नाही इतकाच नाही तर माजलगाव शहराला 30-35 वर्षापासून डीआयडी सर्वे करण्यात आलेला नाही ज्यामुळे दीनदळीत मोलमजुरी कष्ट काम करणारेअसे गरीब गरजू लोकांना शासनाचा विविध योजनांचा लाभ जसे की बांधकामगार योजना संजय



गांधी श्रावण बाळ योजना अर्थसहाय मदत आयुष्यमान योजना कर्ज प्रकरण व असे विविध लाभ मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे व 30-35 वर्षापासून नवीन स्वस्त राशन दुकान व बालवाडीअंगणवाडी माजलगाव शहरामध्ये वाढती लोकसंख्या नुसार 30-35 वर्षापासून दिली नाही यावरही दुर्लक्ष करण्यात आले माजलगाव विधानसभा मतदार संघाचे कोणतेच आमदार यांनी फक्त स्वतःसाठी टक्केवारी घेतल्याशिवाय बरेच विविध विकास कामावर दखल घेतलेली नाही व कोणताच विकास काम केला नाही जर माजलगाव मतदार संघाचा खरा विकास करायचा असेल तर सर्व सामान्य जनतेने नवीन फ्रेश चेहऱ्याला एकदा संधी द्यायला पाहिजे ज्याने करून माजलगाव चा खरा व स्वच्छ विकास होईल त्यामुळे मुस्लिम संघर्ष विकास मोर्चा च्या संस्थापक अध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी माजलगाव विधानसभा मतदार संघासाठी यंग फ्रेश मुस्लिम चेहरा यांना माजलगाव मतदार संघातून एक संधी द्यावी अशी सर्व समाजात जोरदार चर्चा आहे म्हणून मुस्लिम समाजातून व महाराष्ट्र बांधकामगार संघटना च्या सर्व शिष्टमंडळ कडून तथा मुस्लिम संघर्ष विकास मोर्चा च्या सर्व शिष्टमंडळ पदाधिकारी कार्यकर्ते तसेच माजलगाव तालुक्यातील फुलेनगर एक मिनार यंग ग्रुप व टिपू सुलतान मित्र मंडळ बबलू भैया मित्र मंडळ व विविध मित्र मंडळ व सर्व सामान्य जनतेतून मागणी होत आहे

# महिलांनी भूलथापांना बळी पडून रेशनकार्ड ब्लॉक करुन घेऊ नये - एस.एम.युसूफ

## ५० रुपयांचा फॉर्म भरून दरमहा ५ हजार रुपये मिळण्याची अफवा

बीड (प्रतिनिधी) - गेल्या काही दिवसांपासून शहरात एक अफवा जोरात फिरू लागली आहे, ती म्हणजे पन्नास रुपयांचा फॉर्म भरून दिल्यास रेशन कार्डधारकांना शासनाकडून दरमहा पाच हजार रुपये मिळणार. असं काहीही शासनाकडून किंवा प्रशासनाकडून अधिकृतरित्या अजूनपर्यंत तरी कळविण्यात आलेले नाही. शिवाय आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झालेली आहे. यामुळे या काळात आता कोणतीही नवीन योजना शासन-प्रशासनाकडून अंमलबजावणीसाठी येण्याची दुरान्वयेही शक्यता नाही. यामुळे रेशन कार्डधारकांनी अशा अफवांना बळी पडू नये आणि आपले रेशन कार्ड ब्लॉक करून घेऊ नये. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, राज्य शासनाने जेव्हापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेद्वारे महिला भगिनींना दरमहा पंधराशे रुपये देण्यास सुरुवात



केली, तेव्हापासून सातत्याने काही ना काही योजनांच्या नवनवीन अफवा उडू लागल्या आहेत. यात रेशन कार्डधारक महिलांना दरमहा पाच हजार रुपये मिळणार. दरमहा दीड हजार रुपये आले की नाही हे पाहण्यासाठी अँड्रॉइड मोबाईल नसलेल्या महिलांना शासनाकडून अँड्रॉइड मोबाईल मिळणार. उज्वला गॅस योजनेची जोडणी असलेल्या महिलांना तीन मोफत सिलेंडर सह अजून एक जास्तीचा गॅस सिलेंडर मोफत मिळणार वगैरे अफवांचा बाजार गरम झालेला आहे. सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने उडविलेल्या अफवांच्या कोणत्याही योजना अमलात तर येणार नाहीतच शिवाय मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून देण्यात येणारे दरमहा पंधराशे रुपये सुद्धा आता विधानसभा निवडणुकीनंतर नवीन सरकार स्थानापन्न झाल्यावर नवीन सरकारने ही योजना पुढे चालू ठेवण्याची घोषणा केल्याशिवाय ते सुद्धा महिला वर्गाला मिळतील की नाही याची शाश्वती नाही. तेव्हा महिला वर्गाने कोणत्याही अफवांना, आमिषांना बळी न पडता कुणालाही कुठलाही फॉर्म भरून न देता, तहसील कार्यालय बाह्य कुठलेही ऑनलाइन काम करू नये. काही बनवेगिरी करणारे लोक कोणतेतरी फॉर्म पन्नास रुपये घेत ते भरून त्याचा काहीतरी ऑनलाईन कुटाणा करत असल्याचे चर्चिले जात आहे. ज्या महिला या फॉर्म भरून ऑनलाईन कुटाणा करीत आहे. त्यांचे रेशन कार्ड ब्लॉक होत असल्याचेही बोलले जात आहे. ब्लॉक झालेल्या या महिलांचे रेशन कार्ड पूर्ववत कोण सुरू करून देणार? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. या प्रकरणात पुरवठा विभागासह तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन या सर्वांनी दक्ष राहून कारवाई करण्याची गरज आहे. या मागील अष्टमकुष्टम काय आहे? कोण अशा प्रकारे महिलांना मुर्खात काढून ५० रुपयांसाठी त्यांचे रेशन कार्ड ब्लॉक करत आहे? याचा सोक्षमोक्ष किंवा छडा लावण्याचे कार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा अनेक गोरगरीब महिलांचे रेशनकार्ड ब्लॉक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही बाब लक्षात घेऊन रेशनकार्ड विषयी उडविण्यात आलेल्या अफवांना बळी पडू नका. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# ओबीसीचे नेते प्रकाश आण्णा शेंडगे व लक्ष्मण हाके यांनी उमेदवारी दिली तर गेवराई विधानसभा निवडणुक लढविणार - शेंडगे महाराज



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांतील निष्क्रिय नेत्यांमुळे गेवराई तालुक्याचा विकास थांबला आहे. रस्ते, पाणी, वीज यासारखे मूलभूत प्रश्न देखील आतापर्यंत सोडवले गेले नाहीत. आता संघर्षाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आम्ही विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहोत, ओबीसीचे नेते प्रकाश आण्णा शेंडगे व लक्ष्मण हाके साहेब यांनी संधी दिली तर नक्कीच त्या संधीचं सोनं करून तालुक्याचा विकास करणार अशी माहिती बाबुराव शेंडगे महाराज यांनी माहिती दिली. येणारी विधानसभा निवडणूक ही ओबीसी विरुद्ध प्रस्तापित अशीच होणार आहे. त्यात ओबीसी नेते आणि कार्यकर्ते जिंकल्याशिवाय राहणार नाहीत असाविश्वास बाबुराव शेंडगे महाराज यांनी व्यक्त केला आहे. आता जी राजकीय चळवळ उभी राहणार आहे त्यातून नवे नेतृत्व समोर येणार आहे. प्रत्येकजण | म्हणतोय लढणार आतापर्यंत कुणीचमीलढायला तयार या नव्हतं.वातावरणात प्रत्येक विधानसभामतदारसंघातून अनेक ओबीसी नेते.तयार होणार आहेत. त्यामुळे आगामी राजकीय लढा जो आहे तो ओबीसी विरूद्ध प्रस्तापित असाच होणार आहे. हा लढा ओबीसीचे नेते आणि कार्यकर्ते जिंकल्याशिवाय राहणार नाहीत. आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसी नेते प्रकाश आण्णा शेंडगे व लक्ष्मण हाके यांनी गेवराईसाठी उमेदवारी दिली तर, नक्कीच विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणारआणि गोरगरिबांच्या हक्कासाठी लढणार असल्याचे बाबुराव शेंडगे महाराज यांनी बोलताना सांगितले. मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न राज्यात सध्या चर्चिला जात आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी संघटनांनी आक्रमक भूमिका घेत प्रत्येक मतदारसंघात अनेक ओबीसी उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. बाबुराव शेंडगे महाराज यांनी गेवराई तालुक्यातून सर्वात अगोदर ओबीसी पदयात्रा काढली होती. ती पदयात्रा निर्णायक भूमिका घेणारी ठरली, त्यामुळे अशा नेतृत्वांना ओबीसी नेते प्रकाश आण्णा शेंडगे व लक्ष्मण हाके यांनी संधी द्यावी अशी मागणी ओबीसी समाजाकडून केली जात आहे. काही सत्ता नसतानाही तळागाळातील लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्परतेने हजर असतात. ओबीसी नेते प्रकाश आण्णा शेंडगे व लक्ष्मण हाके यांनी उमेदवारी दिली तर त्याच्या नेतृत्वाखालील गोरगरीबांच्या सेवेत तसेच हक्कासाठी सोबत घेऊन लढा देत राहाणार विचारधारांनी सोबत घेऊन विकास साधणार असे बाबुराव शेंडगे महाराज यांनी बोलताना सांगितले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# भाजपचं ठरलं: आज पहिली यादी जाहीर होणार; RSS कडून या नावांसाठी आग्रह

राज्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. 20 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तसंच 23 नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी ताकदीने मैदानात उतरली आहे. अशातच आता भाजपच्या पहिल्या उमेदवारांच्या यादीबाबत अपडेट समोर येत आहे. भाजपकडून उमेदवारांची पहिली यादी उद्या जाहीर होणार आहे. महायुतीतल्या काही उमेदवारांना येत्या 48 तासात एबी फॉर्म दिले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे भाजपकडून जाहीर करण्यात येणाऱ्या या पहिल्या यादीत कुणाची वर्णी लागणार? हे पाहावं लागणार आहे. संघाची भूमिका काय?

विधानसभा निवडणुकांसाठी संघाकडूनही काही नावांची आग्रही मागणी आहे. एकाच मतदारसंघातून संघ आणि भाजप पक्षाकडून वेगवेगळ्या उमेदवारांच्या नावांसाठी आग्रह आहे. महाराष्ट्रात भाजप पक्ष संघटनेकडून केंद्रीय नेतृत्वाकडे विविध नेत्यांच्या उमेदवारीसाठी यादी पाठवण्यात आली आहे. तर दुसऱ्या बाजूला संघ विचार परिवाराकडे काही इच्छुक उमेदवारांनी आग्रह धरला आहे. त्यामुळे आता भाजपच्या यादीत हा समन्वय कसा साधला जाणार?, हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.


कुणाच्या नावांचा आग्रह

डोंबिवलीत रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी मिळावी म्हणून भाजपचा प्रयत्न आहे. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून मंदार हळबे यांच्या नावासाठी आग्रह आहे. मुलुंडमध्ये मनोज कोटक यांच्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून आग्रह आहे. तर भाजप मिहिर कोटेचा यांना उमेदवारी देण्यासाठी इच्छुक आहे. नवी मुंबईतून मंदा म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात यावी, असं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला वाटतं. तर संदीप नाईक यांच्यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जात आहेत. ठाण्यातून विनय सहस्त्रबुद्धे यांनाच उमेदवारी देण्यात यावी, असा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आग्रह आहे. मात्र भाजप संजय केळकर यांना उमेदवारी देऊ इच्छित आहे. महाविकास आघाडीची पहिली यादी 20 तारखेनंतरच जाहीर होण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या बैठकांमुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांच्या उमेदवारांची याद्याही लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. याच आठवड्यात शिंदेंची शिवसेना आणि अजित दादांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. महाविकास आघाडीतील यादी मात्र पुढच्या आठवड्यातच जाहीर होणार आहे.



## बीड विधान सभा मतदार संघात महाविकास आघाडी जे उमेदवार देईन एकजुटीने प्रचार करु

( बीड )बीड महाराष्ट्रामध्ये विधान सभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.महाराष्ट्रात तीन प्रमुख पक्ष आय काँग्रेस,राशप,व उद्धव ठाकरे सेना तिघे एकत्र येवुन महाराष्ट्रामध्ये निवडणुक लढणार आहे. सध्या महाराष्ट्रात महाविकास आघाडी खुप झपाट्यानं पुढे जात आहे.लोकसभा निवडणुकीत ही इंडीया आघाड़ी ने चांगली कामगीरी केली आहे लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहूलजी गांधी यांना कामगार कष्टकरी,शेतकरी, युवकांचा व जनसामान्य जनतेचा खुप मोठा प्रतिसाद मिळत आहे. लोकसभेमध्ये इंडिया आघाडीला चांगले यश मिळाले आहे. आणि आता महाराष्ट्रात ही



महाविकास आघाडीला विधान सभा निवडणुकीत मोठे यश जनतेकडून मिळणार आहे.काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना भाऊ पटोले,खासदार सौ.रजनी ताई अशोक दादा पाटील,ओबीसी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष भानुदास माळी साहेब,काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे प्रदेश अध्यक्ष राधीका ताई मखामले,बीड़ जिल्हा काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष राजे साहेब देशमुख,यांच्या नेतृत्वाखाली बीड विधान सभा मतदार संघात महाविकास आघाडी जे उमेदवार देईन त्या चा एकजुटीने निवडणुकीत प्रचार करू अशी बीड जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग व बीड शहर काँग्रेस ओ बी सी विभाग वतीने बीड जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन बुर्हानोद्दिन ,बीड शहर ओबीसी काँग्रेस चे अध्यक्ष सय्यद फरहान सय्यद शराफत, जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख आमेर पाशा,निराधार निराश्रित व्यक्ति विकास विभागाचे बीड तालुकाध्यक्ष शेख जहीर अमीर यांनी प्रसीधी पत्रकात म्हंटले आहे.

## नामनिर्देशनावेळी पाच व्यक्ती, तीन वाहनांपर्यंत परवानगी

बीड, दिनांक 17 - : निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहनांचा समावेश नसावा. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे. शस्त्र जमा करण्याची कार्यवाही शस्त्र परवानाधारकांची शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने आचारसंहिता कालावधीत सदरील शस्त्रे जमा करावीत. तसेच आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर संबंधितांना त्यांची शस्त्रे परत करण्याची कार्यवाही पोलिस विभागाने करावी. यामध्ये बँक, महत्त्वाची कार्यालये, संस्था, विद्युत केंद्र व इतर महत्त्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून सदरील शस्त्रांबाबत कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद आहे.

## वैद्यकीय क्षेत्र हेच अंतिम ध्येय ठेवू नका :डॉ.नंदकुमार उघाडे

बीड/ प्रतिनिधी आपल्या देशातील बहुतांश हुशार विद्यार्थ्यांचा कल फक्त वैद्यकीय क्षेत्राकडे असल्याचे दिसून येते , साहित्य , अभियांत्रिकी , पत्रकारिता , संशोधन असे अनेक क्षेत्र आहे ज्यामध्ये तुम्ही तुमचे करिअर चांगले करू शकता. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातील बहुतांश हुशारी विद्यार्थी पत्रकारिता आणि संशोधन या क्षेत्राकडे वळतात म्हणूनच अमेरिकेची प्रगती झपाट्याने झाली आहे. आपला सर्वांगीण विकास घडवून आणत असताना देशाचा विकास कसा साध्य होईल याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे . असे प्रतिपादन विविध स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके लिहिणारे लेखक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी केले. पिंपरगव्हाण रोड , बीड येथील श्री . श्री . रविशंकर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. नंदकुमार उघाडे बोलत होते. पुढे बोलताना डॉ. उघाडे म्हणाले की , शाळा ही एक पवित्र संस्था असते तेथे विद्यार्थ्यांची मने सुसंस्कृत करण्याचे कार्य शिक्षक करत असतात . शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे चारित्र्य चांगले घडते , त्याची क्षमता वाढते आणि त्याच्या आयुष्याला आकार येतो. काहीतरी करून दाखवण्याची महत्वाकांक्षा सदैव आपल्या मनात असली पाहिजे . प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ध्येय , उद्दिष्ट मोठे ठेवून ते मिळवण्याचा दृढ संकल्प केला पाहिजे. सतत आपल्या बुद्धीचा विकास करत राहणे हे विद्यार्थ्यांचे ध्येय असावे. इयत्ता आठवी पासूनच योग्य मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वाटचाल ठेवली तर यूपीएससी , एमपीएससी तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये पहिल्याच प्रयत्नात तुम्ही यश मिळवून जिल्हाधिकारी , एसपी , तहसीलदार असे मनाचे व महत्त्वाचे पद मिळवून देशाची सेवा करू शकता. यासाठी अभ्यासातील सातत्य कायम ठेवणे महत्त्वाचे आहे . असेही डॉ. उघाडे म्हणाले. या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या सूर्यवंशी मॅडम यांनी डॉ . नंदकुमार उघाडे यांचा सत्कार केला. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक सुहास सोनवणे यांनी केले.

## क्षेत्र महाजनवाडी येथे आज पासून होणार फिरता नारळी श्री संतएकनाथम हारजकृत भावार्थ रामायण कथेला प्रारंभ – विष्णूदासजी महाराज सुरवसे

बीड जिल्ह्यात प्रत्येक गावाततील श्री हनुमान मंदीरात होणार भावार्थ रामायण ग्रंथाचे वाटप ह.भ.प.प.पू.श्री योगीराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या शुभहस्ते होणार कथेला प्रारंभ बीड (प्रतिनिधी) श्री क्षेत्र अयोध्याधाम येथील श्रीराम मंदीरास व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठेस येत्या 22 जानेवारी 2025 ला एक वर्ष पुर्ण होत आहे. तरी श्री राम मंदीर व श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनाचे औचित्य साधून बीड तालुक्यातील श्री क्षेत्र महाजनवाडी येथे आजपासून महाराष्ट्रातील प्रथमच फिरता नारळी श्रीएकनाथमहाराजकृत भावार्थ



रामायण कथेला प्रारंभ होत आहे. तसेच बीड जिल्ह्यातील 51 गावातील श्री हनुमान मंदीरामध्ये प्रत्येक गावात शनिवार ते शनिवार असा आठ दिवस श्री भावार्थ रामायण कथा सोहळा संपन्न होत असून त्यामुळे प्रत्येक गावागावत भक्तीमय व प्रसन्न वातावरणाची निर्मिती होवून श्रीराम नामाचा गजर होईल. गेली 50 वर्षापासून श्रीक्षेत्र महाजनवाडी येथे श्री भवार्थ रामायण कथेचे दरवर्षी नियमीत आयोजन करण्यात येते.यंदा मात्र श्री क्षेत्र अयोध्याधाम येथील श्रीराम मंदीर व प्रभु श्रीरामाच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिनाचे औचित्य साधून श्री भावार्थ रामायण सेवा समितीच्या वतीने फिरता नारळी श्री एकनाथमहाराजकृत भावार्थ रामायण कथेचा शुभारंभ अश्विन कृ.1 शुक्रवार दि.18 ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ठिक 7 वा. श्रीसंतएकनाथ महाराजांचे 14 वे वंशज श्री एकनाथ पदाश्रित ह.भ.प.प.पू योगीराज महाराज गोसावी पैठणकर यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत श्री हनुमान मंदीर श्री क्षेत्र महाजनवाडी ता.जि. बीड येथे संपन्न होत आहे. तरी बीड जिल्ह्यातील रामायणाचार्य वाचक,सूचक व श्रीमराभक्त मंडळींनी मोठ्या संख्येने या फिरत्या नारळी श्रीएकनाथमहाराकृत भावार्थ रामायण कथेच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित रहावे. असे आवाहन श्री भावार्थ रामायण सेवा समिती व निमंत्रक विष्णूदासजी महाराज सुरवसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# निवडणूक शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून आदेश निर्गमित

बीड दि. 17 - : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 ची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा प्रशासनाने काही निर्बंध घातले आहेत. तशा स्वरूपाचे आदेश जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी निर्गमित केले आहेत. सदरील आदेश प्रत्येकावर तामील करणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिस विभागाने जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, सदरील आदेश २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहतील, असेही निर्गमित आदेशांमध्ये नमूद आहे. वेगवेगळ्या आदेशात पुढील बाबी नमूद आहेत. शासकीय, निमशासकीय परिसर जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि विश्रामगृहांच्या आवारात कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाजाचा वापर राजकीय कामासाठी करणे, रॅली काढणे, निवडणुकीसंबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग्स, होर्डिंग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, किंवा कार्यालयीन आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे, किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इ.बाबी नियंत्रित करणे या कृती करण्यास निर्बंध घालण्यात आला आहे. सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, व जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपित करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणुकीच्या कालावधीत होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व जाहिराती प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच पूर्व परवानगी संपल्यानंतर ते दूर नष्ट करून इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपता करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. मतपत्रिका छपाई राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी, मुद्रणालय मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने, प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव, त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना मतपत्रिका छापण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत. यावरही असतील निर्बंध सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण इ. करण्यावर तसेच जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर, राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे वाहनाच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध असतील. प्रचार वाहनांवरील झेंडा, कापडी फलक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून दोन फूट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. वाहनावर लावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही. ध्वनीक्षेपकाचा वापर ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी व रात्री दहा नंतर कोणत्याही फिरत्या वाहनांवर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधित घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील. रहदारीस अडथळा नको राजकीय पक्षांनी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेटस्, कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. खासगी व्यक्तीच्या जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत इत्यादीच्या संबंधित जागा मालकाचे परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत आहेत, असेही नमूद आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# ७० मुलांकडून सलमानची रेकी, पाकिस्तानी शस्त्रे आणि: शूटर सुखाचा धक्कादायक खुलासा

**बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर अभिनेता सलमान खान याच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. पनवेल पोलिसांनी या प्रकरणी सुक्खा उर्फ सुखबीर बलबीर सिंह या प्रमुख शूटरला अटक केली आहे**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर अभिनेता सलमान खान याच्या



सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. सलमान खानला गुंड लॉरेन्स बिश्नोई याने अनेकदा धमकी दिली आहे. तसेच लॉरेन्स बिश्नोई गँगने सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्याची देखील घटना घडली आहे. त्यामुळे सलमान खानला वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्यात आली आहे. सलमान खानच्या पनवेल येथील फॉर्म हाऊसबाहेरही बिश्नोई गँगकडून रेकी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणी पनवेल पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पनवेल पोलिसांनी हरियाणाच्या पाणीपत येथे जावून बिश्नोई गँगचा शूटर सुक्खा उर्फ सुखबीर बलबीर सिंह याला अटक केली आहे. सुक्खा यानेच सलमान खानच्य घरावर गोळीबार करण्याचा कट आखला होता, अशी माहिती तपासातून समोर आली आहे. आरोपी सुक्खा याला पोलिसांनी पनवेलला आणलं. त्याची कसून चौकशी करण्यात आली. यावेळी सुक्खाच्या चौकशीत त्याने सलमानच्या घरावर हल्ला करण्याचा कट कसा आखला? याबाबत सविस्तर कबुली दिली. आपण लॉरेन्स बिश्नोई गँगचा सक्रिय सदस्य असल्याची कबुली त्याने दिली. तसेच त्यानेच बिश्नोई गँगच्या इतर सदस्यांना सलमान खानला जीवे मारण्याची सुपारी दिली होती. तसेच शूटर्सना चांगल्या पिस्तूल पुरवण्यासाठी त्याने पाकिस्तानात बसलेल्या त्याच्या गँगच्या एका कुख्यात गुंडाशी संपर्क केला होता,

### बिश्नोई गँगमध्ये अल्पवयीन शूटर

विशेष म्हणजे नवी मुंबई पोलिसांनी याच वर्षी जून महिन्यात महत्त्वपूर्ण खुलासा केला होता. आरोपींकडून सलमान खानला त्याच्या पनवेल फॉर्म हाऊसला जाताना निशाणा केलं जाऊ शकतं. तसेच लॉरेन्श बिश्नोई गँगमध्ये अल्पवयीन शूटरदेखील असल्याचं पोलिसांनी म्हटलं होतं. ते पाकिस्तानातून आणलेल्या शस्त्रांच्या माध्यमातून सलमानवर हल्ला करु शकतात. तर दुसरीकडे आपल्या घरावर झालेल्या हल्ल्यानंतर सलमानने लॉरेन्स बिश्नोई गँगने आपल्याला किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांना मारण्याच्या हेतूने गोळीबार केला होता, असा दावा केला होता.



## श्रीक्षेत्र कपिलधार येथे कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी श्रीक्षेत्र कपिलधार येथे प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त कपिलधार देवस्थानच्या वतीने शि.भ.प. उमाकांत आप्पा मिटकरी यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. या कोजागिरी पौर्णिमेला 111 लिटर दुधाच्या प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यावेळी कीर्तनकार महाराजांनी श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामीनी जो मार्ग दाखविला तो शुद्ध अंतकरणाने, निस्वार्थ केलल कर्म, व भक्तीसेवा ही मानव समाजाला उच्च स्थानी घेऊन जाते . संताने दाखविलेल्या भक्ती मार्गाने समाज प्रबोधन होते.असे महाराजानी आपल्या शिव कीर्तनात सांगितले. तसेच रात्री हाडोंग्री भजनी मंडळ, तमलूर भजनी मंडळ ,मासिक पौर्णिमा भजनी मंडळ बीड तसेच चिंचोली भजनी मंडळ, मन्मथ भजनी मंडळ कळब यांनी कार्यकार्यक्रमास उपस्थित लावली. तसेच यावेळी कार्यक्रमास उपस्थित पूजेचे यजमान नागेश आप्पा मिटकरी बीड, मन्मथ स्वामी देवस्थान पुजारी विश्वनाथ स्वामी आप्पा (कपिलधार), वैजनाथ दगडू शिंदे महाराज दत्त संस्थान (कपिलधारवाडी), शंकर स्वामी जायफळकर, मन्मथ स्वामी देवस्थानचे विश्वस्त अश्रुबा रसाळ, शिवशंकर आप्पा भुरे, झांबरे आबा, अशोक शहागडकर, श्रीकांत मिटकरी, सुशील रसाळ, सोमनाथ रसाळ, डॉ. त्रिंबक स्वामी, नाना शिंगणापूर, अविनाश तोडकर, डॉ. वलांडे, हलकुडे आप्पा, दिनेश राजमाने आदी उपस्थित होते.

-------

# पराभवाचा धसका? मध्यरात्री गुपचूप भेट:

## मनोज जरांगेंना महायुती आणि महाविकास आघाडीचे कोणते नेते भेटले?

**दैनिक लोकआरंभ//**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे बिगुल अखेर वाजले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी पत्रकार परिषद घेत राज्यातील निवडणुकांची घोषणा केली. येत्या २० नोव्हेंबर २०२४ ला महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक पार पडणार आहे. तर त्यानंतर लगेचच तीन दिवसांनी २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होतील. आगामी विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजताच राज्यातील सर्वच पक्ष जोमाने कामाला लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत अनेकांना मराठा मतांचा फटका बसला होता. त्यामुळे सावधगिरीचा पर्याय म्हणूनसर्वच पक्षातील आमदार आणि नेते मराठा समाजाचे बसू नये म्हणून भेटीगाठी सुरु राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे घनसावंगीचे आमदार



नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत आहेत. विधानसभा निवडणुकीत कोणताही फटका राजेश टोपे यांनी मनोज जरांगे पाटील यांची मध्यरात्री भेट घेतली आहे. रात्री पावणे तीन वाजता राजेश टोपे आणि मनोज जरांगे पाटील यांच्यात बैठक झाली. अंतरवाली सराटीत ही बैठक पार पडली. यावेळी राजेश टोपे आणि मनोज जरांगे यांच्यात कोणत्या विषयावर चर्चा झाली, याची अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. मात्र लोकसभा निवडणुकीत जरांगे पॅटर्न हा चांगलाच चालला होता. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीत कोणताही फटका बसू नये, यासाठी अनेक नेते हे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत आहेत.

शक्यतो रात्रीच्या वेळी अनेक नेते अंतरवाली सराटीत

राजेश टोपे यांच्या आधी रात्रीच्या अंधारात राधाकृष्ण विखे पाटील यांनीही मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी वेगवेगळ्या पक्षातील नेते मंडळी भेट घेत आहेत. काल रात्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अंतरवाली सराटीमध्ये जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. या आठ दिवसात राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांची दुसऱ्यांदा भेट घेतली आहे. सध्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्यासाठी शक्यतो रात्रीची वेळ निवडत आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांनीही जरांगेंना भेटण्यासाठी रात्री पावणे दोन वाजताची वेळ घेतली होती.

## ॥ श्रीज्ञानेश्वरी ।



श्री गणेशाय नमः ॥ ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्यो । आत्मरूपा ॥१॥ देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु। महा आहारयासु । अवधारिजो जी ॥२१॥ हैं शब्दारा अरोचें। तेचि मूर्ति सुर्वेष। जेथ वर्णवपु निर्दोष। मिरवत असे ॥ ३॥ स्मृति तेचि अवेव । देखा आंगीक भाव। तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥ ४॥ अबेदश पुराणे। तींचि मणिभूषणें। पेंदपद्धती खेवणें। अध्यदलांचीं ॥५॥ पदबंध नागरि । तेंचि रंगाथिलें अंबर। जेथ साहित्य वाणें सपूर। उजाळाचें ॥ ६॥ देखा काव्यनाटका। जें निर्धारितां सकौतुका । त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥७॥ नाना प्रमेयांची परी। निपुणपणें पाहतां कैंसरी। दिसती उचित पढ़ें माझारीं। रत्नें भलीं ॥ ८॥ तेथ व्यासादिकांच्या मतीं। तेचि मेखळा मिरवती। चोखाळपणें झळकती। पल्लवसडका ॥९॥ देखा षड्दर्शनें म्हणिपती। तेचि भुजांची आकृती। म्हणौनि विसंवादें धरिती। आयुधें हातीं ॥ १०॥ तरी तर्क तोचि फरशु। नीति भेदु अंकुशु। वेदान्तु तो महारसु। मोदकु मिरवे ॥ ११॥ एके हातीं दंतु। जो स्वभावता खंडितुं । तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकाचा ॥ १२॥ मग सहजें सत्कारवादु। तो पद्मकरु वरखु। धर्मप्रतिष्ठा तो सिद्धू । अभयहस्तु ॥ १३॥ देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु । जेथ परमानंदु केवळु। महासुखाचा ॥ १४॥ तरी संवादु तोचि दशनु। जो समता शुभ्रवर्ण। देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु। विघ्नराजु ॥ १५॥ मज अवगमलिया दोनी। मीमांसा श्रवणस्थानीं। बोधमदामृत मुनी। अली सेविती ॥ १६॥ प्रमेयप्रवाल सुप्रभ। द्वैताद्वैत तेचि निकुंभ। सरिसेपणे एकवटत

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com